PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sasurwashin
Year: 1978

Song: Mahachalu Ga Dilbar Majha
Lyricist: Shanta Shelke, Chintamani Potdar

शुभ्र पांढरा बगळा जसा
बाहेरून हा तसा
आतून पक्का डोम कावळा
भेद काढतो कसा
समदं चुपचाप नाही गाजावाजा
समदं चुपचाप नाही गाजावाजा
महा चालू गं
हो महा चालू गं दिलबर माझा
हाय महा चालू गं दिलबर माझा

माझी दौलत लाख मोलाची
लई बारीक नजर याची
माझी दौलत लाख मोलाची
लई बारीक नजर याची
ऐवज समदा हेरून ठेवतोय
बिलंदराचा राजा
महा चालू गं
हे महा चालू गं दिलबर माझा
रे महा चालू गं दिलबर माझा

काय करू घात गं झाला
कावेबाजानं घातला घाला
काय करू घात गं झाला
कावेबाजानं घातला घाला
कळलंच नाही कवा सटकला
साधून आपुल्या काळजा
महा चालू गं
हो महा चालू गं दिलबर माझा
हाय महा चालू गं दिलबर माझा

अशी कशी मी पडले फशी
पर फसण्यात वाटते खुशी
अशी कशी मी पडले फशी
पर फसण्यात वाटते खुशी
डोळ्यानं त्याला सांगते यायला
व्हटानं म्हणते जा जा
महा चालू गं
हे महा चालू गं दिलबर माझा
हाय महा चालू गं दिलबर माझा
समदं चुपचाप नाही गाजावाजा
समदं चुपचाप नाही गाजावाजा
महा चालू गं
हे महा चालू गं दिलबर माझा
रे महा चालू गं दिलबर माझा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*